• वर्ष : ०४ • अंक : ०६४ • पुणे • मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

‘मफलरमॅन’चा अखेर खुलासा

रोहित पवारांच्या निशाण्यावर थेट मुख्यमंत्री फडणवीस

- अजितदादांच्या अपघातावरून राजकारणात खळबळ!
- रोहित सिंगच्या लग्नातील फडणवीसांचा मफलर घातलेला फोटो दाखवत गंभीर आरोप
- “दादांचा अपघात की घातपात, याचा तपास CBI कडूनच व्हावा”; नऊ महिने उलटूनही तपासाबाबत असमाधान व्यक्त

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या तपासावरून महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठा राजकीय भूकंप होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या ‘मफलरमॅन’चा अखेर खुलासा करत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोटो पत्रकार परिषदेत झळकावला. VSR कंपनीचे मालक रोहित सिंग यांच्या लग्नातील मफलर घातलेल्या फडणवीसांच्या छायाचित्राच्या आधारे त्यांनी सरकार आणि संबंधित कंपनीच्या कथित संबंधांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. मात्र, फडणवीस अजितदादांच्या अपघातामागे असल्याचा आरोप आपण करत नसल्याचेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले. VSR कंपनी आणि व्ही. के. सिंग यांना वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याचा त्यांचा मुख्य आरोप आहे.





मुंबई (दै. आरंभ पर्व)

१६ नोव्हेंबर रोजी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या तपासातील कथित त्रुटी, VSR कंपनीचे व्यवहार, सरकारी आर्थिक व्यवहार आणि काही राजकीय व्यक्तींशी असलेले संबंध याबाबत अनेक कागदपत्रे व छायाचित्रे सादर केली. नऊ महिने उलटूनही तपासात ठोस निष्कर्ष समोर आलेला नसल्याने हा केवळ अपघात नसून घातपाताची शक्यताही तपासली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. ‘नऊ महिने झाले, तरी तपास कुठे अडकला?’ रोहित पवार यांनी यापूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदांमधील मुद्द्यांचा आढावा घेत तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. प्राथमिक अहवालातील त्रुटी, FIR दाखल करताना आलेल्या अडचणी आणि तपासाची माहिती मिळविण्यासाठी माहिती अधिकारांतर्गत केलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. अजित पवार यांच्यासारख्या वरिष्ठ नेत्याच्या अपघाताची चौकशी करताना तपास यंत्रणांनी अधिक पारदर्शकता दाखवायला हवी होती, असे ते म्हणाले. विमान कंपनीच्या विमानांमध्ये DGCA ने काही अनियमितता नोंदवल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. संबंधित अधिकाऱ्यांवर आणि कंपनीच्या जबाबदार व्यक्तींवर कारवाई का झाली नाही, असा सवाल त्यांनी केला. मुंबईतील यापूर्वीच्या विमान अपघाताच्या प्रकरणात FIR दाखल करण्यात आली होती, तर अजितदादांच्या प्रकरणात तशी कारवाई करण्यास टाळाटाळ का झाली, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी VSR कंपनीशी संबंधित रोहित सिंग आणि राहुल सिंग यांच्या कथित परदेशी मालमत्ता, गुंतवणूक आणि व्यावसायिक संबंधांबाबत काही दावे केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, सिंग कुटुंबाने अजित पवार यांच्या मृत्यूनंतर अवघ्या दोन दिवसांनी अमेरिकेतील फ्लोरिडा येथे सुमारे १८ कोटी रुपयांचे घर खरेदी केले. या व्यवहारासह परदेशातील कंपन्यांमधील गुंतवणुकीचीही चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. अमेरिकेतील काही व्यक्तींशी असलेल्या कथित व्यावसायिक संबंधांचा उल्लेख करत त्यांनी अमली पदार्थ आणि शस्त्र व्यवहारांशी संबंधित व्यक्तींची नावेही घेतली. मात्र, या आरोपांची स्वतंत्र तपासातून पडताळणी होणे आवश्यक आहे. VSR कंपनीच्या विमानांच्या मालकीबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. अजित पवार यांनी प्रवास केलेले विमान सुमारे ४० कोटी रुपयांचे असून, त्याची खरेदी रोखीने झाल्याचा दावा त्यांनी केला. या व्यवहारात धनादेशाचा वापर झाला नसल्याचा आरोप करत संबंधित विमानाची मालकी आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.

इंदापूर-माळशिरस तालुक्यांना जोडणाऱ्या निमसाखर येथील नीरा नदीवरील पुलाला २५ कोटींचा निधी

केंद्रीय मार्ग निधीतून पुलासाठी मंजुरी; कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पाठपुराव्याला यश

- तीन महिन्यांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे नियोजन
- इंदापूर-माळशिरस तालुक्यांतील दळणवळणाला मिळणार नवी गती!



इंदापूर (दै. आरंभ पर्व)

इंदापूर आणि माळशिरस या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या निमसाखर-बांगर्डे दरम्यान नीरा नदीवर नवीन पूल उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या महत्त्वपूर्ण पुलासाठी केंद्रीय मार्ग निधीतून (सीआरएफ) तब्बल २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी ही माहिती दिली. या पुलामुळे अनेक वर्षांपासूनचा नदीपार वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागणार असून, विशेषतः विद्यार्थ्यांचा पावसाळ्यातील जीवघेणा होडी प्रवास कायमचा थांबण्यास मदत होणार आहे. येत्या तीन महिन्यांत प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे नियोजन असल्याचेही मंत्री भरणे यांनी स्पष्ट केले.

निमसाखर हे इंदापूर तालुक्यातील प्रमुख व्यापारी केंद्र आणि शैक्षणिक हब म्हणून ओळखले जाते. परिसरात मोठी शैक्षणिक संकुले असल्याने आसपासच्या गावांतील शेकडो विद्यार्थी शिक्षणासाठी निमसाखर येथे येतात. निमसाखरच्या दक्षिण दिशेला नीरा नदीच्या पलीकडे माळशिरस तालुक्यातील बांगर्डे गाव वसलेले आहे. बांगर्डे येथील ग्रामस्थांना दैनंदिन व्यवहार, बाजारपेठ आणि इतर कामांसाठी निमसाखरवर अवलंबून राहावे लागते. मात्र, नदीवर पूल नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात नदीला पाणी वाढल्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी होडीतून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत होता. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न कायमच चिंतेचा विषय बनला होता. तसेच निमसाखर, दगडवाडी आणि निरवांगी परिसरातील नागरिकांना माळशिरस तालुक्यात जाण्यासाठी लांबचा वळसा घालावा लागत असल्याने वेळ, पैसा आणि श्रम यांचा अपव्यय होत होता. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी निमसाखर, दगडवाडी, निरवांगी आणि बांगर्डे येथील ग्रामस्थांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे सातत्याने पुलाची मागणी केली होती. नागरिकांची ही गरज लक्षात घेऊन मंत्री भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे या पुलासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

तीन महिन्यांत कामाला सुरुवात करण्याचे नियोजन

याबाबत बोलताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, "निमसाखर-बांगर्डे दरम्यान नीरा नदीवर होणारा हा पूल दोन्ही तालुक्यांतील नागरिक, शेतकरी आणि विशेषतः विद्यार्थ्यांसाठी संजीवनी ठरणार आहे. या पुलामुळे नागरिकांचा प्रवास सुलभ होईल आणि दळणवळणाला मोठी गती मिळेल. येत्या तीन महिन्यांत निविदा प्रक्रिया आणि इतर आवश्यक प्रशासकीय सोपस्कार पूर्ण करून पुलाच्या प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करण्याचा

दोन तालुक्यांतील अंतर कमी होणार;

२५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाल्याने निमसाखर, बांगर्डे, दगडवाडी आणि निरवांगी परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पुलामुळे विद्यार्थ्यांचा सुरक्षित प्रवास, शेतकऱ्यांची वाहतूक, व्यापारी व्यवहार आणि दोन्ही तालुक्यांतील सामाजिक व आर्थिक संपर्क अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीला निधी मंजूर झाल्याने आता प्रत्यक्ष बांधकाम कधी सुरू होते आणि पुलाचे काम कधी पूर्ण होते, याकडे

बेकायदेशीर दारू विक्रीला आशीर्वाद कोणाचा?

अनेक महिलांचे संसार उद्ध्वस्त; अनधिकृत धाब्यांवर देशी-विदेशी दारूची खुलेआम विक्री | पोलिस प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह | विषारी गावठी दारूमुळे जीवितहानी होऊनही धाब्यांवरील अवैध विक्री सुरूच

पुणे (सोमनाथ साळुंके) (दै. आरंभ पर्व)

विषारी गावठी दारूच्या सेवनामुळे निष्पाप नागरिकांचे बळी जात असताना दुसरीकडे ग्रामीण भागातील अनधिकृत धाब्यांवर देशी आणि विदेशी दारूची खुलेआम विक्री सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. गावठी दारूच्या अवैध धंद्यांविरोधात पोलिस प्रशासनाने कारवाईची मोहीम हाती घेतली असली, तरी अनधिकृत धाब्यांवरील दारू विक्रीकडे दुर्लक्ष का केले जात आहे? या व्यवसायांना नेमका कोणाचा आशीर्वाद आहे? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महिलांमध्ये संताप

काही दिवसांपूर्वी विषारी गावठी दारूच्या सेवनामुळे अनेकांना जीव गमवावा लागल्याची घटना घडल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली होती. त्यानंतर पोलिस प्रशासनाला जाग आली आणि अवैध गावठी दारू तयार करणारे तसेच विक्री करणाऱ्यांविरोधात धडक कारवाई सुरू करण्यात आली. मात्र, या कारवाईनंतर आता ग्रामीण भागातील अनधिकृत धाब्यांवर सुरू असलेल्या देशी-विदेशी दारू विक्रीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

ग्रामीण भागातील प्रमुख महामार्गांवर तसेच गावांच्या आसपास कोणत्याही आवश्यक परवानग्या न घेता अनेक धाबे उभारण्यात आल्याचे चित्र दिसून येते. या धाब्यांच्या नावाखाली खुलेआम दारू विक्री केली जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. विशेष म्हणजे, अशा व्यवसायांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने संबंधित व्यावसायिकांचे धाडस वाढत असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

दारूच्या व्यसनाचा सर्वाधिक फटका सामान्य कुटुंबांना बसत आहे. शेतकरी, शेतमजूर आणि रोजंदारीवर काम करणारे अनेक जण दिवसभर कष्ट करून मिळवलेली कमाई कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी खर्च करण्याऐवजी दारूवर उधळत असल्याचे चित्र आहे. परिणामी घरातील आर्थिक परिस्थिती खालावत असून, पतीच्या व्यसनामुळे महिलांना मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक महिलांना मारहाण व कौटुंबिक छळाचा सामना करावा लागत असून, काही कुटुंबे विभक्त झाली आहेत, तर काही महिलांनी माहेरचा आधार घेतला आहे. व्यसनाधीनतेमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत असल्याची विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, अन्यायाविरोधात न्याय मिळावा म्हणून अनेक महिला पोलिस प्रशासनाकडे धाव घेतात. मात्र, अवैध दारू विक्रेत्यांविरोधात अपेक्षित कारवाई होत नसल्याची त्यांची तक्रार आहे. काही व्यावसायिकांकडून पोलिस यंत्रणेतील संबंधितांना नियमित आर्थिक देवाणघेवाण होत असल्याचा संशयही नागरिक व्यक्त करीत आहेत. या आरोपांची निष्पक्ष चौकशी होण्याची गरज असून, पोलिस प्रशासनाने अशा तक्रारींची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

दारू विक्रीतून मिळणाऱ्या पैशाच्या जोरावर संबंधित व्यावसायिक खुलेआम व्यवसाय करीत असून, आपल्यावर कोणतीही कारवाई होणार नाही, अशा थाटात वावरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गावठी दारूमुळे जीवितहानी झाल्यानंतर प्रशासनाने धडक कारवाई सुरू केली असली, तरी अनधिकृत धाब्यांवरील दारू विक्रीविरोधातही तितक्याच कठोरपणे कारवाई कधी होणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.



दारूच्या व्यसनामुळे उद्ध्वस्त झालेल्या संसारांना जबाबदार कोण? अवैध धंद्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या यंत्रणेची जबाबदारी निश्चित होणार का? आणि महिलांना न्याय मिळणार तरी कधी? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. प्रशासनाने केवळ दिखाऊ कारवाई न करता अनधिकृत धाब्यांची तपासणी करून विनापरवाना दारू विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच अशा व्यवसायांना अभय देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची गय करू नये, अशी मागणी नागरिक आणि महिलांकडून होत आहे. अवैध दारू विक्रीचे जाळे वेळीच उद्ध्वस्त केले नाही, तर आणखी किती कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाल्यानंतर प्रशासनाला जाग येणार? हा संतप्त सवाल आता ग्रामीण भागातील महिलांकडून विचारला जात आहे.

ग्रामीण भागात चालतोय वीजचोरीचा खेळ

- महावितरणचा लाखो रुपयांचा महसूल पाण्यात
- प्रशासन अधिकारी तुपाशी, महावितरण उपाशी



पुणे : सोमनाथ साळुंके (दै. आरंभ पर्व)

जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील ग्रामीण भागात सर्रासपणे महावितरण अधिकाऱ्यांच्या भोंगळ कारभारामुळे वीजचोरीचा खेळ सुरू असल्यामुळे महावितरण विभागाचा या भागातून मिळणारा लाखो रुपयांचा महसूल पाण्यात जाऊन प्रशासन अधिकारी तुपाशी तर महावितरण विभाग उपाशी असे म्हणण्याची वेळ आली आहे.

आज समाजातील प्रत्येक व्यक्तीस ज्याप्रकारे अन्न,वस्त्र,निवारा या मूलभूत गरजा अती महत्वाच्या मानल्या जात आहे.त्याचप्रमाणे वीजेची असणारी आवश्यकता तेवढीच गरजेची वाटू लागली आहे.सध्या शहरात सर्वत्र विजेचा लखलखाट दिसून येत असतानाच त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील नागरिकांना देखील वीजेची सुविधा उपलब्ध होण्याच्या उद्देशाने जुन्नर,खेड,आंबेगाव या तालुक्यासह इतर तालुक्यातील ग्रामीण भागात वीज पोहचविण्यास महावितरण विभागास यश येऊन नागरिकांनी देखील यामुळे समाधान व्यक्त केले आहे.

मात्र तसे पाहिले तर शहरी भागात एखाद्या वीजग्राहकास असलेले वीजबिल भरण्यास थोडासा जरी विलंब झाला तर अशा वीजग्राहकांच्या विजमीटर करून तात्काळ कारवाईची अंमलबजावणी केली जात असल्याचे चित्र आपल्याला शहरात पाहायला मिळत आहे. पण यास अपवाद ठरत आहे तो म्हणजे ग्रामीण भाग या भागात अनेक गाव, वाड्या_ वस्त्या ह्या डोंगराच्या पायथ्याशी वसलेले असल्याची माहिती सूत्राकडून समजली आहे. मात्र शासनाच्या नियमानुसार एखाद्या वीजग्राहकास वीजमीटर घ्यायचे झाल्यास त्यास कायद्याच्या नियमानुसार त्यासाठी असणारी रक्कम भरणे गरजेचे आहे. मात्र या भागातील अनेक स्थानिक नागरिक हे महावितरण विभागातील कर्मचाऱ्यांशी हातमिळवणी करून खुलेआमपणे वीजेची चोरी करत असल्याचे निदर्शनास येते.अशा ठिकाणी वरिष्ठ अधिकारी देखील घटनेचे गांभीर्य लक्ष्यात न घेता फिरकत नसल्यामुळे वीजचोरांना देखील मोकळे रान सापडले आहे.ज्यावेळेस एखाद्या ठिकाणी वीजचोरीतून मोठी दुर्घटना घडल्यावरच झोपी गेलेल्या महाप्रशासन अधिकाऱ्यांना यासंदर्भात जाग येते. विशेष करून अनेक भागात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने सर्रासपणे वीजचोरीच्या घटना अधिकाऱ्यांसमोर घडत असताना देखील अशा नागरिकांवर कारवाई करण्याऐवजी वीजचोरी होत आहे.त्यामुळे अधिकाऱ्यांच्या या भूमिकेमुळे अनेक स्थानिक नागरिक संभ्रमात पडून आश्चर्य व्यक्त करत आहे.

आज ग्रामीण भागातील गावामध्ये जवळपास तीस ते चाळीस टक्के ही वीजेची चोरी होत असल्याची शंका उपस्थित होऊन खरोखरच अशा वीजचोरावर कारवाई भविष्यकाळात होणार की,नाही.याबाबत शंका उपस्थित होऊन अनेक घरांनी वीजेच्या चोरीतून घरातील फ्रीज,मिक्सर,बल्ब, हिटर आदी वस्तूंचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे वीजेची चोरी किती मोठ्या प्रमाणात होते हे सांगणे कठीण आहे. दोन आठवड्यापूर्वी जुन्नर तालुक्यातील काही भागात सध्या स्मार्ट वीज मीटर बसविण्याचे काम प्रगतीपथावर असतानाच ते बसविण्यास अनेक भागातील नागरिकांनी स्मार्ट वीज मीटर बसविण्यास विरोध दर्शविला असला तरी पण यामागचा हेतू काय? ते समजणे देखील सध्याच्या परिस्थितीत कठीण आहे.

बहुतांश प्रमाणात महावितरण अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याशी अर्थपूर्ण चर्चा करण्यापेक्षा अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन समाजातील वीज ग्राहकापर्यंत पोहचवून करणाऱ्या वीजेच्या चोरीपासून स्वतःचे नाही तर कुटुंबाचे किती मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते किंवा वीजचोरी पकडली गेल्यास संबंधित ग्राहकास आकारण्यात येणारा दंड व होणारी शिक्षा याबाबत जनजागृती करणे काळाची गरज असून भविष्यात होणाऱ्या वीजचोरीला आळा बसून महावितरण विभागाचा महसूल वाढण्यास मदत होईल हे मात्र निश्चित मानले जात आहे.त्यामुळे वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांवर वचक बसविणे ही काळाची गरज आहे.अन्यथा भविष्यात वीज कंपनीचे बुडणारा महसूल यास वरिष्ठ महावितरण अधिकारी व कर्मचारी हेच जबाबदार राहतील हे मात्र निश्चित मानले जात आहे.



व्हीआयपी कल्चर थांबवा

रस्ते जनतेचे आहेत, सत्ताधाऱ्यांच्या मिरवणुकीचे नाहीत !

सत्ताधाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांना तासन्तास रस्त्यावर रोखणे कितपत योग्य? रुग्णवाहिकेतील रुग्णाचा जीव, डिलिव्हरी बॉयच्या रोजीरोटीचा प्रश्न, शाळेत जाणाऱ्या लहान मुलांचा वेळ आणि सामान्य नोकरदारांचे नुकसान याला जबाबदार कोण? लोकशाहीत पद मोठे असले तरी जनतेपेक्षा मोठे असू शकत नाही!

लोकशाहीत प्रत्येक नागरिक समान आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. संविधानाने प्रत्येकाला समानतेचा आणि मुक्त संचाराचा अधिकार दिला आहे. मात्र प्रत्यक्ष रस्त्यावरचे चित्र पाहिले की या लोकशाहीच्या संकल्पनेलाच धक्का बसतो. एखादा मंत्री, राजकीय नेता, मोठा अधिकारी किंवा व्हीआयपी शहरात येणार असेल, तर त्याच्या स्वागतासाठी आणि सुरक्षेसाठी रस्त्यांवर पोलिसांचा फौजफाटा उभा राहतो. चौक बंद होतात, सिग्नलवरील वाहतूक रोखली जाते, वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात आणि सामान्य नागरिकांना ताटकळत उभे राहावे लागते. काही मिनिटांचा प्रवास तासाभराचा होतो. हा प्रकार म्हणजे केवळ वाहतूक कोंडी नसून सामान्य जनतेच्या वेळेवर, श्रमावर आणि नागरी स्वातंत्र्यावर घातलेला घाला आहे.

व्हीआयपींच्या सुरक्षेला विरोध असण्याचे कारण नाही. देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्याचे मुख्यमंत्री किंवा संवैधानिक पदांवरील व्यक्ती यांच्या सुरक्षेची जबाबदारी निश्चितच महत्त्वाची आहे. परंतु सुरक्षा आणि सत्तेचे प्रदर्शन यामध्ये फरक आहे. सुरक्षेच्या नावाखाली संपूर्ण शहरातील नागरिकांना वेठीस धरणे, रस्ते अडवणे आणि वाहतूक ठप्प करणे ही कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय बाब ठरू शकत नाही.

एका बाजूला सरकार आरोग्यसेवा, वेळेवर उपचार आणि नागरिकांच्या जीवितरक्षणाच्या घोषणा करते; तर दुसऱ्या बाजूला एखाद्या व्यक्तीच्या दौऱ्यासाठी रस्ते बंद करून आरोग्यसेवेच्या मूलभूत गरजेलाच अडथळा निर्माण होतो. ही विसंगती संतापजनक आहे.

डिलिव्हरी बॉय, ऑनलाइन सेवा पुरवणारे कर्मचारी, रिक्षाचालक, टॅक्सीचालक, कामावर जाणारे कर्मचारी, विद्यार्थी आणि शाळकरी मुले यांचेही मोठे नुकसान होते. डिलिव्हरी बॉयला वेळेत पार्सल पोहोचवता आले नाही, तर त्याच्या उत्पन्नावर परिणाम होतो. शाळेची बस अडकली तर लहान मुलांचे शैक्षणिक वेळापत्रक कोलमडते. नोकरदार उशिरा पोहोचला तर त्याला कार्यालयात जाब द्यावा लागतो. या प्रत्येकाच्या वेळेची किंमत आहे. मग केवळ व्हीआयपींच्या वेळेलाच महत्त्व का?

व्हीआयपींच्या दौऱ्यांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबत न्यायालयांनीही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली आहेत. ही बाब केवळ भावनिक किंवा राजकीय नसून नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांशी संबंधित आहे.

१. मद्रास उच्च न्यायालय – ८ मार्च २०१८

मद्रास उच्च न्यायालयाने व्हीआयपींच्या वाहनांच्या हालचालीसाठी शक्यतो पाच ते दहा मिनिटांपेक्षा अधिक काळ वाहतूक थांबवू नये, असे निर्देश दिले होते. राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांसारख्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यांसाठी आवश्यक अपवाद मान्य ठेवण्यात आले होते. वाहतूक शक्य तितकी सुरळीत ठेवण्याचेही न्यायालयाने सांगितले.

२. कलकत्ता उच्च न्यायालय – ३ मे २०१८

Rituparna Sarkar Dutta v. State of West Bengal या प्रकरणात न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. नागरिकांना मुक्त संचाराचा आणि उपजीविकेचा अधिकार आहे. राजकीय सभा, मिरवणुका किंवा अन्य कार्यक्रमांमुळे नागरिकांच्या या अधिकारांवर गदा येता कामा नये. न्यायालयाने स्पष्ट केले की, कोणताही प्रमुख किंवा महत्त्वाचा रस्ता पूर्णपणे बंद करून पादचारी आणि वाहनांची वाहतूक रोखता कामा नये. रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलासारख्या अत्यावश्यक सेवांना कोणत्याही प्रकारे अडथळा होता कामा नये.

३. केंद्रीय गृह मंत्रालयाची मार्गदर्शक तत्त्वे – २०१६

राज्यसभेत १६ मार्च २०१६ रोजी दिलेल्या उत्तरात केंद्रीय गृह मंत्रालयाने दिल्लीतील व्हीआयपी वाहतुकीसंदर्भात महत्त्वाची माहिती दिली होती. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि राष्ट्रपती किंवा पंतप्रधान स्तराची सुरक्षा असलेल्या परदेशी मान्यवरांच्या सुरक्षित मार्गासाठीच वाहतूक थांबवावी; अन्य प्रकरणांत वाहतूक थांबवू नये, असे त्या मार्गदर्शक तत्त्वांत नमूद होते. आपत्कालीन वाहनांसाठी योग्य व्यवस्था करण्यावरही भर देण्यात आला होता.

ही दिल्लीसाठीची मार्गदर्शक तत्त्वे आहेत; ती संपूर्ण देशासाठी लागू असलेला सरसकट नियम समजू नयेत. मात्र व्हीआयपी वाहतुकीबाबत प्रशासनाने कोणता दृष्टिकोन ठेवावा, याचा महत्त्वाचा आदर्श त्यातून दिसतो.

४. सर्वोच्च न्यायालय आणि लाल दिव्यांची व्हीआयपी संस्कृती

Abhay Singh v. State of Uttar Pradesh या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने २०१३ मध्ये वाहनांवरील लाल दिव्यांचा अनधिकृत वापर आणि सायरनच्या गैरवापरावर निर्बंध घालण्याबाबत निर्देश दिले. त्यानंतर २०१७ मध्ये केंद्र सरकारने लाल दिव्यांची व्हीआयपी संस्कृती संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला. आपत्कालीन सेवांना मात्र आवश्यक दिव्यांचा वापर करण्याची मुभा ठेवण्यात आली.

या सर्व बाबींमधून एकच गोष्ट स्पष्ट होते. सुरक्षा आवश्यक आहे; पण सामान्य नागरिकांच्या हालचालींवर अनावश्यक बंधने घालण्याचे समर्थन करता येत नाही. आज अनेकदा एखाद्या राजकीय नेत्याच्या दौऱ्यात पुढे पोलिसांची वाहने, मागे सुरक्षारक्षकांच्या गाड्या, त्यानंतर समर्थकांच्या गाड्या आणि अन्य वाहनांचा मोठा ताफा दिसतो. प्रश्न असा आहे की, सुरक्षेसाठी नेमकी किती वाहने आवश्यक आहेत? प्रत्येक दौऱ्याला एवढा मोठा ताफा कशासाठी? पदाचा प्रभाव दाखवण्यासाठी की प्रत्यक्ष सुरक्षेसाठी?

सुरक्षेच्या निकषांनुसार आवश्यक तेवढाच ताफा असावा. अनावश्यक वाहनांची संख्या कमी करावी. पर्यायी मार्ग, नियंत्रित वाहतूक आणि तात्पुरत्या व्यवस्थांचा वापर करावा. वाहतूक पूर्णपणे बंद करण्याऐवजी टप्प्याटप्प्याने वाहने सोडण्याची व्यवस्था करावी.

विशेष म्हणजे, एखादा नेता किंवा मंत्री दौऱ्यासाठी येणार असल्यास नागरिकांना आधीच माहिती देणे आवश्यक आहे. कोणते रस्ते किती वेळ बंद राहणार, पर्यायी मार्ग कोणते असतील, रुग्णालयांकडे जाण्यासाठी कोणती व्यवस्था असेल, याची माहिती सार्वजनिक करावी. रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि अन्य आपत्कालीन वाहनांना तातडीने मार्ग उपलब्ध करून देणे बंधनकारक असावे.

राज्य सरकार आणि गृह विभागाने व्हीआयपी दौऱ्यांसाठी स्पष्ट आणि नागरिककेंद्रित धोरण आखण्याची गरज आहे.

- राष्ट्रपती, पंतप्रधान आणि विशेष सुरक्षा आवश्यक असलेल्या मान्यवरांव्यतिरिक्त अन्य व्यक्तींसाठी वाहतूक पूर्णपणे थांबवण्याऐवजी नियंत्रित करावी.
- सुरक्षा यंत्रणांच्या मूल्यांक नानुसार ताफ्यातील वाहनांची संख्या मर्यादित ठेवावी.
- रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि आपत्कालीन सेवांसाठी स्वतंत्र मार्ग किंवा तातडीने मार्ग मोकळा करण्याची व्यवस्था असावी.
- शाळा, रुग्णालये आणि गर्दीच्या ठिकाणांजवळ वाहतूक रोखण्याचे विशेष नियोजन करावे.
- दौऱ्याची माहिती, वाहतूक बदल आणि पर्यायी मार्ग नागरिकांना आधीच कळवावेत.
- अनावश्यक वाहतूक रोखणाऱ्या किंवा आपत्कालीन वाहनांना अडथळा निर्माण करणाऱ्या यंत्रणेची जबाबदारी निश्चित करावी.
- व्हीआयपी दौऱ्यांमुळे झालेल्या वाहतूक कोंडीचा आढावा घेऊन त्यावर सार्वजनिक अहवाल प्रसिद्ध करावा.

व्हीआयपींच्या सुरक्षेसाठी व्यवस्था असावी; पण व्हीआयपींच्या प्रतिष्ठेसाठी जनतेला वेठीस धरण्याची व्यवस्था नसावी. लाल दिवे गेले, पण मानसिकतेतील व्हीआयपी संस्कृती अद्याप संपलेली नाही. आता ही मानसिकता बदलण्याची वेळ आली आहे. लोकशाहीत रस्ते कोणाच्या मालकीचे नसतात. ते जनतेच्या वापरासाठी असतात. त्यामुळे व्हीआयपी संस्कृतीच्या नावाखाली होणारी अनावश्यक वाहतूक कोंडी थांबलीच पाहिजे.

कारण लोकशाहीत खरा व्हीआयपी कोण? तर सामान्य नागरिक!

लोकशाहीत जनता व्हीआयपी असली पाहिजे!

सत्तेची खुर्ची कायमस्वरूपी नसते. आज मंत्री असलेली व्यक्ती उद्या सामान्य नागरिक असू शकते. आज सत्तेत असलेला नेता उद्या विरोधी बाकावर बसू शकतो. परंतु रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि नागरी हक्क हे कोणत्याही व्यक्तीच्या पदापेक्षा मोठे आहेत. लोकप्रतिनिधींनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, त्यांना जनतेने निवडून दिले आहे. जनतेच्या सेवेसाठी त्यांना पद मिळाले आहे; जनतेला त्रास देण्यासाठी नाही. लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेला प्राधान्य देताना नागरिकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होता कामा नये. एखाद्या रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी धावणारी रुग्णवाहिका, आपल्या कामावर वेळेत पोहोचण्याचा प्रयत्न करणारा डिलिव्हरी बॉय, शाळेत जाणारे निष्पाप बालक आणि रोजच्या संघर्षातून संसार चालवणारा सामान्य माणूस हेही या देशाचे महत्त्वाचे नागरिक आहेत. त्यांच्या वेळेला आणि जीवाला तितकेच महत्त्व आहे.

रुग्णवाहिका अडकली तर जबाबदार कोण?

या व्हीआयपी संस्कृतीचा सर्वाधिक गंभीर परिणाम आपत्कालीन परिस्थितीत दिसून येतो. एखाद्या रुग्णाला हृदयविकाराचा झटका आला असेल, अपघातात गंभीर दुखापत झाली असेल किंवा गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी रुग्णालयात नेले जात असेल, तर त्याच्यासाठी प्रत्येक मिनिट महत्त्वाचे असते. अशा वेळी व्हीआयपींच्या ताफ्यासाठी रस्ता बंद केला असेल आणि रुग्णवाहिका वाहतूक कोंडीत अडकली असेल, तर त्या रुग्णाच्या जीवाची जबाबदारी कोण घेणार?

थोडक्यात पण महत्वाचे



कष्टकरी महिलांची दिवाळी गोड; तीन मंडळांकडून साड्यांचे वाटप

धायरी (आरंभ पर्व) : दिवाळीचा सण प्रत्येकाच्या घरी आनंद घेऊन येतो. मात्र रोजंदारीवर काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांनाही सणाचा आनंद घेता यावा, या उद्देशाने धायरीतील तीन मंडळांच्या वतीने गुजरवाडी येथील लवासा वस्तीवर महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. मळाई माता नवरात्र उत्सव मंडळ, श्रीमंत धारेश्वर महादेव संस्थान आणि गणेश मित्र मंडळ, धायरी यांच्या संयुक्त विद्यमाने ११ नोव्हेंबर रोजी हा उपक्रम राबविण्यात आला. लवासा वस्ती परिसरातील मोलमजुरी करणाऱ्या महिला, पारधी, बैलपत्थर, गाडी सोनार समाजातील महिला तसेच इतर गरजू भगिनींना दिवाळीनिमित्त साड्या देण्यात आल्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे म्हणाले, रोजंदारीवर काम करणाऱ्या कष्टकरी महिलांची दिवाळीदेखील आनंदात साजरी व्हावी. आपण सण साजरे करताना समाजातील या घटकांचाही विचार केला पाहिजे. याच भावनेतून साडी वाटपाचा उपक्रम हाती घेतल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी दिलीप रायकर, चंद्रकांत रायकर यांच्यासह मंडळांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

पुण्यात २२ नोव्हेंबरला उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

- ३ लाख १६ हजार २७५ बालकांना दोन थेंब पाजण्याचे उद्दिष्ट; शहरात १,३६७ लसीकरण केंद्रांची उभारणी

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने रविवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२६ रोजी पुणे शहरात उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत शहरातील शून्य ते पाच वर्षे वयोगटातील एकूण ३ लाख १६ हजार २७५ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यासाठी शहरात एकूण १ हजार ३६७ लसीकरण केंद्रे उभारण्यात येणार आहेत. रविवारी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत या लसीकरण केंद्रांवर बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत. पालकांनी आपल्या घरातील तसेच परिसरातील शून्य ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना जवळच्या लसीकरण केंद्रावर आणून लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने केले आहे.

फटाके विक्रीतून मिळालेला नफा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी



- नऱ्हेतील तरुणांचा सामाजिक उपक्रम
- धाराशिव जिल्ह्यातील गौर गावात शेतकरी कुटुंबांना किराणा साहित्याचे वाटप

पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)

दिवाळीत फटाके विक्रीतून मिळालेला नफा स्वतःसाठी न वापरता दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी खर्च करण्याचा निर्णय नऱ्हे येथील तरुणांनी घेतला. या उपक्रमातून धाराशिव जिल्ह्यातील गौर गावातील दुष्काळाचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांना किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले.

नऱ्हे पुणे येथील सेवाभावी फटाका स्टॉलमधून फटाके विक्री करण्यात आली होती. या विक्रीतून मिळालेला नफा गौर गावातील गरजू शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी देण्यात आला. दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना काहीसा आधार मिळावा, या हेतूने किराणा साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. सणासुदीच्या काळात स्वतःचा आनंद साजरा करण्याबरोबरच अडचणीत असलेल्या कुटुंबांसाठीही काहीतरी करता यावे, या भावनेतून तरुणांनी हा उपक्रम हाती घेतला. फटाके विक्रीतून मिळालेल्या नफ्याचा विनियोग गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी केल्याने त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते चेतन इंगळे, शुभम मारणे, मयूर पवार, निलेश लांडगे, प्रवीण शिंदे, सिद्धांत देशमुख आणि वेदांत देशमुख उपस्थित होते.

सातत्याने भेटण्यात जिवंत राहण्याचे भाग्य मिळते

गझलकार म. भा. चव्हाण

- साहित्य सम्राट पुणे संस्थेचे २३२ वे 'शब्द गोड दिवाळी' कवी संमेलन उत्साहात
- कवी-कवयित्रींच्या कवितांनी रसिकांची मने जिंकली



उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)

मराठी साहित्याची उंची वाढविण्यासाठी प्रत्येक साहित्यिकाने कसदार, विज्ञानवादी आणि जागतिक दर्जाचे लेखन केले पाहिजे. सत्कार आणि सन्मानाची अपेक्षा न ठेवता साहित्यनिर्मितीशी प्रामाणिक राहणे महत्त्वाचे आहे. सातत्याने एकमेकांना भेटण्यात आणि साहित्याच्या माध्यमातून जोडलेले राहण्यातच जिवंत राहण्याचे खरे भाग्य मिळते, असे प्रतिपादन ज्येष्ठ गझलकार म. भा. चव्हाण यांनी केले.

साहित्य सम्राट पुणे संस्थेच्या नाबाद २३२ व्या 'शब्द गोड दिवाळी' कवी संमेलनाचे आयोजन साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे स्मारक समितीच्या संयुक्त विद्यमाने नेहरू स्टेडियम, स्वारगेट येथील दलित स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात करण्यात आले होते. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून चव्हाण बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून साहित्यिका सु. भा. लोंढे, ज्येष्ठ ग्रंथपाल सदानंद माळी, डी.एस. एस.चे माजी संघप्रमुख दादासाहेब सोनवणे, साहित्य सम्राट पुणेचे संस्थापक विनोद अष्टुळ आणि रानकवी जगदीप वनशिव उपस्थित होते. आपल्या मनोगतात चव्हाण म्हणाले की, विनोद अष्टुळ हे निष्ठेने आणि सातत्याने मराठी भाषेचे कार्यक्रम आयोजित करीत असून, साहित्य सम्राट ही केवळ संस्था नसून एक साहित्यिक चळवळ आहे. संस्थेने आतापर्यंत २३२ कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या व्यासपीठावर जात-धर्माचा विचार न करता माणसातील साहित्यिक गुणांना महत्त्व दिले जाते. आजच्या पिढीची साहित्याकडून अपेक्षा बदलली आहे. मराठी साहित्याला जागतिक स्तरावर पोहोचवायचे असेल, तर लेखकांनी केवळ काल्पनिक आणि मनोरंजनात्मक लेखन न करता आपल्या लेखणीची उंची वाढवून दर्जेदार साहित्य निर्माण केले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून साहित्यिकांचे कौतुक केले तसेच साहित्यनिर्मितीच्या वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन केले. मान्यवरांचा सत्कार झाल्यानंतर 'शब्द गोड दिवाळी' कवी संमेलनाला सुरुवात झाली. काव्यगीतांच्या सादरीकरणाने संमेलनाला विशेष रंगत आली.

या संमेलनात दशरथ दुनघव, बाबा ठाकूर, शाम गाडे, पार्थ धडे, श्रीराम धडे, श्रीकांत ढोबळे, रमाकांत ढोबळे, अमोल भोसले, खलील शेख, ॲड. रामचंद्र पाचुणकर, सागर सोनवणे, चांगदेव आढागळे, सुनील जोशी, ऊर्मिला पवार, वृंदा गंभीर, प्राजक्ता गंभीर, अरुण घोडके, ॲड. रमाकांत आदमाने, सु. भा. लोंढे, कांचन मून, सुजाता नानेकर, विजय जाधव, सुजित रणदिवे, सदानंद माळी, दादासाहेब सोनवणे, जगदीप वनशिव आणि विनोद अष्टुळ आदी कवी-कवयित्रींनी विविध विषयांवरील कविता व गीते सादर केली. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संमेलनात सहभागी झालेल्या प्रत्येक कवी-कवयित्रीला मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र आणि 'सत्यांश' दिवाळी विशेषांक देऊन गौरविण्यात आले. कला, काव्य आणि फराळ यांचा सुरेख संगम असलेल्या या वार्षिक कवी संमेलनाने साहित्यप्रेमींना दिवाळीची अनोखी मेजवानी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद अष्टुळ व सुजित रणदिवे यांनी केले. सूत्रसंचालन जगदीप वनशिव यांनी केले, तर दादासाहेब सोनवणे यांनी आभार मानले.

पर्यावरण संरक्षणाचे नियम सर्वांसाठी समान नकोत का?

- गणपती विसर्जनासाठी हौद, मग छटपूजेसाठी का नाहीत?
- धार्मिक भावना जपताना नद्या, धरणे आणि तलावांचे प्रदूषण रोखण्याची जबाबदारीही सर्वांचीच!

शब्दांकन : राजेश बोबडे नागरिक, नऱ्हे पुणे

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतात विविध धर्मांचे सण आणि उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. प्रत्येक सणामागे धार्मिक श्रद्धा, परंपरा आणि भावना जोडलेल्या असतात. मात्र, या उत्सवांच्या निमित्ताने निसर्गाचे आणि पर्यावरणाचे नुकसान होऊ नये, याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गणेशोत्सवाच्या काळात गणपती बाप्पांच्या मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी नद्या, तलाव आणि धरणांमधील पाण्याचे प्रदूषण रोखता यावे, यासाठी प्रशासनाकडून ठिकठिकाणी कृत्रिम विसर्जन हौदांची व्यवस्था केली जाते. नागरिकांनाही या हौदांमध्ये मूर्ती विसर्जित करण्याचे आवाहन केले जाते. पर्यावरणाच्या दृष्टीने हा उपक्रम निश्चितच महत्त्वाचा आहे. मात्र, याच पार्श्वभूमीवर छटपूजेच्या वेळीही नद्या, धरणे आणि तलावांचे प्रदूषण टाळण्यासाठी कृत्रिम पाण्याचे हौद किंवा पर्यायी व्यवस्था का केली जात नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. गणेश विसर्जनाच्या वेळी पर्यावरणाची काळजी घेणे आवश्यक असेल, तर छटपूजेच्या वेळीही तीच काळजी घेतली गेली पाहिजे. कोणत्याही धार्मिक परंपरेला विरोध करण्याचा प्रश्न नाही; मात्र जलस्रोतांचे संरक्षण करताना प्रशासनाने सर्वांसाठी समान निकष लागू करणे गरजेचे आहे. धार्मिक श्रद्धा जपल्या गेल्याच पाहिजेत, पण त्याचबरोबर पुढच्या पिढ्यांसाठी स्वच्छ नद्या, तलाव आणि धरणेही जपली गेली पाहिजेत. पर्यावरण संरक्षण ही कोणत्याही एका धर्माची किंवा समाजाची जबाबदारी नसून ती सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

गणपती विसर्जनासाठी कृत्रिम हौदांची व्यवस्था होऊ शकते, तर छटपूजेसाठीही अशी व्यवस्था करण्याचा विचार प्रशासनाने का करू नये? पर्यावरण संरक्षणाचे नियम सण किंवा धर्म पाहून ठरवले जाऊ नयेत. ते सर्वांसाठी समान असावेत.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



स्वर,संगीत आणि सुरेल गीतांचा अनोखा संगम

जुन्नर (आरंभ पर्व) : दिवाळी पाडव्याचा शुभमुहूर्तावर ओतूर येथे आयोजित संगीत मैफिलीत यावर्षी शिवजन्मभूमीचा सुपुत्र फिल्मफेअर व राज्य पुरस्कर विजेता गायक मयूर सुकाळे, सूर नवा ध्यास नवा फेम गायिका संज्योती जगदाळे,राष्ट्रीय पुरस्कार विजेती गायिका डॉ केतकी चैतन्य यांचा सुमधुर गायनाने हजारो प्रेक्षक अगदी मंत्रमुग्ध झाले होते. ओतूरचे सुपुत्र रमेश शिवाजीराव डुंबरे यांचा दातृत्वातून सुरु झालेल्या "स्वर गंगेचा काठावरती" या संगीत महोत्सवाचे हे चौथे पर्व होते. श्री कपर्दीकेश्वर देवधर्म संस्था,सह्याद्री शिवभूमी चॅरिटीज ट्रस्ट, शिवनेरीचे शिलेदार समूह व ग्रीन व्हिजन फाउंडेशन यांचा संयुक्त विद्यमाने व प्रा.शुभांगी डुंबरे व रमेश डुंबरे यांचा दातृत्वाने या दिवाळी सांज संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. कमलेश भडकमकर यांचे संगीत संयोजन आणि निलेश परब व कृष्णा मुसळे यांचा ढोलकीची जुगलबंदी पाहताना रसिक देहाभान विसरून गेले. शिवरायांची आरती,भावगीते, भक्तिगीते,पोवाडा,गवळणी,लावणी,चित्रपटगीते या स्वर संध्या दिवाळी संगीत मैफिलीत सादर करण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजन अनिल तांबे,पोपट नलावडे महेंद्र गांधी यांनी केले. कुस्तीचा आखाड्यात बहरलेल्या या संगीत मैफिलीत हजारो दर्दी रसिकांनी उपस्थित राहून या मैफिलीचा आनंद घेतला.

वंदना शैलेंद्रसिंग परदेशी यांचे वयाच्या ६७ व्या वर्षी निधन



जुन्नर (आरंभ पर्व) : आपला आवाज न्यूज नेटवर्कचे मुख्य संपादक तथा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ (इलेक्ट्रॉनिक मीडिया) चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अतुल परदेशी आणि जुन्नर नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष, गटनेते तथा माजी नगरसेवक दीपेश परदेशी यांच्या मातोश्री कै. वंदना शैलेंद्रसिंग परदेशी (वय ६७) यांचे सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज सोमवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता जुन्नर येथील भास्कर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाने परदेशी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, जुन्नर शहरासह पत्रकारिता आणि राजकीय क्षेत्रातून शोक व्यक्त केला जात आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक असा परिवार आहे.

एअरटेल ग्राहकांना ₹३० हजारांहून अधिक किमतीचे रिवॉर्ड्स



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : एअरटेल ग्राहकांसाठी कंपनीने 'एअरटेल इनसाइडर' या उपक्रमाच्या माध्यमातून आकर्षक रिवॉर्ड्स आणि विशेष ऑफर्स उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रीमियम सबस्क्रिप्शन, शॉपिंग डील्स, प्रवास, खाद्यपदार्थ आणि मनोरंजन अशा विविध क्षेत्रांतील आघाडीच्या ब्रँड्सच्या ऑफर्सचा लाभ ग्राहकांना एकाच ठिकाणी घेता येणार आहे. या सर्व ऑफर्सचे एकत्रित मूल्य ३० हजार रुपयांहून अधिक असल्याचा कंपनीचा दावा आहे. एअरटेलचे कनेक्शन ग्राहकांना केवळ दूरसंचार सुविधा देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्या दैनंदिन जीवनात अतिरिक्त फायदे मिळवून देणारे ठरत आहे. 'एअरटेल इनसाइडर'च्या माध्यमातून ग्राहकांना विविध ब्रँड्स आणि सेवांशी संबंधित आकर्षक सवलती व रिवॉर्ड्सचा लाभ घेता येणार आहे. एअरटेल इनसाइडरमागील संकल्पना म्हणजे एअरटेल ग्राहकांना केवळ कनेक्टिव्हिटीच नव्हे, तर त्यापलीकडेही अधिक मूल्य मिळवून देणे. डुओलिंगोच्या माध्यमातून नवीन भाषा शिकणे, क्रोमामधून गॅजेट्सची खरेदी करणे, सिनेपोलिसमध्ये चित्रपटांचा आनंद घेणे किंवा पॉकेट एफएमवर मनोरंजनाचा अनुभव घेणे, अशा विविध गरजा आणि आवडीनिवडींनुसार ग्राहकांना ऑफर्सचा लाभ घेता येणार आहे.

फॉरएव्हर52 आणि भूमिका बहल यांची भागीदारी



पुणे (आरंभ पर्व) : आपल्या शहराच्या किंवा गावाच्या पलीकडे जाऊन मेकअप कलेचा विस्तार करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मेकअप कलाकारांसाठी आता आंतरराष्ट्रीय स्तरावर शिकण्याची एक अनोखी संधी उपलब्ध झाली आहे. फॉरएव्हर52 ने अकॅडेमिक बाय फॉरएव्हर52 या उपक्रमांतर्गत देशव्यापी मेकअप टॅलेंट स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेतील एका विजेत्याला दुबईला जाण्याची, आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्टकडून प्रशिक्षण घेण्याची तसेच भारतातील सुप्रसिद्ध मेकअप प्रशिक्षक भूमिका बहल यांच्यासोबत प्रशिक्षण घेऊन नवे कौशल्य आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे. दुबई टूर स्पर्धेमध्ये भारतभरातील मेकअप आर्टिस्ट, मेकअपचे विद्यार्थी, नवशिके तसेच ब्युटी कंटेंट क्रिएटर्स यांना आपली कलात्मकता आणि कौशल्ये सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी अकॅडमिक बाय फॉरएव्हर52 चे किमान एक उत्पादन वापरून स्वतःचा एक आकर्षक आणि नाविन्यपूर्ण मेकअप लूक तयार करणे आवश्यक आहे. तसेच, मेकअपसंदर्भातील एक व्यावसायिक टिपही शेअर करावी लागेल. यातून चार उपांत्य फेरीतील स्पर्धकांची निवड केली जाईल आणि त्यापैकी एका स्पर्धकाची महाविजेता म्हणून निवड होईल. महाविजेत्याला भूमिका बहल आणि फॉरएव्हर52 यांच्या सहकार्याने आयोजित तीन दिवसांच्या दुबई दौऱ्याची संधी मिळणार आहे. या दौऱ्यात व्यावसायिक मेकअप प्रशिक्षणासह प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्रही प्रदान केले जाईल. उर्वरित तीन उपांत्य फेरीतील स्पर्धकांना अकॅडमिक बाय फॉरएव्हर52 सिरीज व्हॅनिटी प्रदान करण्यात येईल. तसेच, त्यांना दिल्ली येथील भूमिका बहल अकॅडमीमध्ये एक दिवस प्रशिक्षण घेऊन मेकअप कलेतील बारकावे शिकण्याची विशेष संधी मिळणार आहे. लहान शहरांमधील उदयोन्मुख मेकअप कलाकारांपासून ते देशभरातील व्यावसायिक मेकअप क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या नवोदितांपर्यंत सर्वांसाठी हा उपक्रम दुबईमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण आणि अनुभव मिळविण्याची संधी उपलब्ध करून देत आहे. ही केवळ एक स्पर्धा नसून, कलाकारांना आपले कौशल्य सादर करण्यासाठी, ज्ञान आणि अनुभवाची देवाणघेवाण करण्यासाठी तसेच व्यावसायिक क्षेत्रातील आपली महत्त्वाकांक्षी स्वप्ने साकार करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यासाठी मिळालेले व्यासपीठ आहे. मेकअप क्षेत्रातील प्रतिभावान कलाकारांना ओळख देणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे या फॉरएव्हर52 च्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा उपक्रम एक भाग आहे.

गुणवंतांचा कोल्हे अँड असोसिएट्सतर्फे गौरव

कै. भाऊसाहेब दादा कोल्हे यांच्या स्मरणार्थ निमंत्रितांचे कवी संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न

पुणे (दै. आरंभ पर्व)

कोल्हे अँड असोसिएट्स, पुणे यांच्या वतीने आयोजित 'निमंत्रितांचे कवी संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा २०२६' रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रोड, पुणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्ष म्हणून जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथील अँड. शितल प्रविण कोल्हे यांनी जबाबदारी सांभाळली, तर कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध कवी, लेखक व दिग्दर्शक मा. हृदयमानव अशोक उपस्थित होते. पुरस्कार वितरण सोहळ्यास भाजपा जिल्हा उपाध्यक्ष, अहिल्यानगर मा. यशवंत दादा उर्फ वाय. डी. कोल्हे आणि पीएच. डी. पदवीधारक मा. डॉ. अर्चना सगळगिळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच प्रसिद्ध कवयित्री व लेखिका मा. गीता भावसार आणि सिद्धार्थ बॉक्सिंग क्लबचे संस्थापक अध्यक्ष मा. मनोज रणमले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी साहित्य, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल 'साहित्य गौरव पुरस्कार २०२६' मा. आत्तम गेंदे यांना त्यांच्या 'आग्या मोहोळ' या गझलसंग्रहासाठी प्रदान करण्यात आला. सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रसिद्ध कवी व सामाजिक कार्यकर्ते मा. आजाद कवी प्रभू सुनगर यांना 'समाज गौरव पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच उत्कृष्ट शिक्षक व हरित शाळेचे शिल्पकार मा. शेख रमजान बादशाह यांना 'शिक्षण गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त करत अशा साहित्यिक आणि सांस्कृतिक उपक्रमांची समाजाला नितांत आवश्यकता असल्याचे सांगितले. मा. यशवंत दादा उर्फ वाय. डी. कोल्हे यांनीही आपल्या मनोगतातून उपक्रमाचे कौतुक केले. निमंत्रित कवींनी आपल्या दर्जेदार आणि आशयपूर्ण कविता सादर करून उपस्थित रसिकांची मने जिंकली. कवितांमधून सामाजिक वास्तव, मानवी भावना, जीवनमूल्ये आणि विविध विषयांचे प्रभावी दर्शन घडले. कार्यक्रमाचे निवेदन निखिल सुक्रे यांनी प्रभावीपणे केले. या प्रसंगी अँड. प्रविण कोल्हे, इंजि. प्रदिप कोल्हे, अँड. आकाश भिलारे, अँड. महेश पवार, प्रथमेश गंगणे, रितेश वहीले, रोहित वाळुंजकर, अभि साळुंके, विराज देशमुख, राधा गायकवाड, अँड. अमर सतीजा, अँड. रोहिणी साळवे, यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, कवी आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. साहित्य, कला, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंतांचा सन्मान करणे आणि नवोदित कवींना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजक अँड. प्रविण कोल्हे यांनी सांगितले. या उपक्रमाच्या माध्यमातून साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळीला अधिक बळ मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सीआयआय तर्फे पुण्यात 'नेक्स्टजेन मोबिलिटी शो' आणि 'सरफेस कोटिंग शो २०२६'

- भारताच्या मोबिलिटी आणि उत्पादन क्षेत्रातील पुढील झेप अधोरेखित करणारे प्रदर्शन व परिषद

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारताला जागतिक स्तरावरील उत्पादन आणि मोबिलिटी क्षेत्रातील आघाडीचे केंद्र बनविण्याच्या दिशेने देशाची वाटचाल सुरू असताना, द कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) पश्चिम विभागातर्फे चौथ्या 'सीआयआय नेक्स्टजेन मोबिलिटी शो २०२६' आणि 'सीआयआय सरफेस कोटिंग शो २०२६'चे आयोजन १९ ते २१ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटरमध्ये करण्यात आले आहे. पाच हजार चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळावर होणाऱ्या या प्रदर्शनांना आठ हजारांहून अधिक लोक भेट देतील, अशी अपेक्षा आहे. उत्पादन, तंत्रज्ञान, संशोधन आणि धोरणनिर्मिती क्षेत्रातील प्रमुख घटकांना एकत्र आणणारे हे प्रदर्शन मोबिलिटीचे भविष्य, प्रगत उत्पादन तंत्रज्ञान आणि शाश्वत औद्योगिक विकासाला दिशा देणाऱ्या नव्या संकल्पना आणि उपाययोजना सादर करणार आहे. 'स्पीड, स्केल, सस्टेनेबिलिटी' (वेग, विस्तार आणि शाश्वतता) या संकल्पनेवर आधारित 'नेक्स्टजेन मोबिलिटी शो'मध्ये इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी तंत्रज्ञान, ऑटोमोबाईल इलेक्ट्रॉनिक्स, सॉफ्टवेअर आधारित वाहने, कनेक्टेड मोबिलिटी, पर्यायी इंधने आणि स्मार्ट उत्पादन प्रणाली यांमधील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रदर्शन होणार आहे.

लोणीकंदच्या विकासासाठी जयेश कंद निवडणुकीच्या मैदानात!

लोकनियुक्त सरपंचपदाची निवडणूक लढविण्याचा निर्धार; सर्वांगीण विकासाचा संकल्प व्यक्त

लोणीकंद (दै. आरंभ पर्व)

आगामी २०२७ मध्ये होणाऱ्या लोणीकंद ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीचे पडघम आतापासूनच वाजू लागले असून, गावातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या पार्श्वभूमीवर जयेश कंद यांनी लोकनियुक्त सरपंचपदाची निवडणूक लढविण्याचा निर्धार जाहीर केला आहे. त्यांच्या या घोषणेमुळे लोणीकंदच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

दिवाळीनिमित्त आयोजित स्नेहमेळाव्यात ग्रामस्थांशी संवाद साधताना जयेश कंद यांनी आपल्या राजकीय भूमिकेची स्पष्ट घोषणा केली. लोणीकंद गावाचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्यासाठी आपण निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामस्थांचा विश्वास, सहकार्य आणि आशीर्वाद यांच्या बळावर गावाच्या विकासाची नवी दिशा निर्माण करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.



दरम्यान, २०२७ च्या ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जयेश कंद यांनी सरपंचपदासाठी उमेदवारीची घोषणा केल्याने लोणीकंदमधील राजकीय समीकरणांना आतापासूनच वेग येण्याची शक्यता आहे. त्यांच्या या निर्णयाला ग्रामस्थांकडून कसा प्रतिसाद मिळतो आणि आगामी निवडणुकीत कोणती राजकीय समीकरणे आकाराला येतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळी गावातील प्रलंबित प्रश्न, मूलभूत सुविधा, विकासकामे आणि नागरिकांच्या अपेक्षा यांवर त्यांनी भाष्य केले. गावाच्या विकासासाठी केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृतीतून काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. निवडणूक जिंकणे हे अंतिम ध्येय नसून गावातील प्रत्येक घटकाला विकासाच्या प्रवाहात आणणे, हीच आपली प्राथमिकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "आपली लढाई कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून ती लोणीकंदच्या सर्वांगीण विकासासाठी आहे. गावाच्या उज्ज्वल भविष्यासाठी संघर्षातून विकासाकडे आणि संघर्षातून विजयाकडे जाणारा हा आपला प्रवास असेल," असा विश्वास जयेश कंद यांनी व्यक्त केला.

या स्नेहमेळाव्याला ग्रामस्थ, तरुण कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी गावाच्या प्रगतीसाठी मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

सोन्याचे दर वाढले म्हणून मेकिंग चार्जेस का वाढावेत?

- AMCCIE ची केंद्र सरकारकडे मागणी
- सोन्याच्या बाजारभावाशी मेकिंग चार्जेस जोडण्यास विरोध

नवी दिल्ली/पुणे (दै. आरंभ पर्व)

सोन्याच्या बाजारभावात वाढ झाली म्हणून सोन्याच्या दागिन्यांवरील मेकिंग चार्जेसही आपोआप वाढण्याचे कारण काय? असा सवाल उपस्थित करत अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन (AMCCIE) यांनी दागिन्यांवरील मेकिंग चार्जेस निश्चित करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. मेकिंग चार्जेस सोन्याच्या बाजारभावाच्या टक्केवारीनुसार न आकारता, प्रत्यक्ष कारागिरी, डिझाइन, वजन आणि मेहनतीच्या आधारे निश्चित करण्यात यावेत, अशी भूमिका चेंबरने मांडली आहे. AMCCIE चे



राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी या संदर्भात सांगितले की, ग्राहक आता अधिक जागरूक झाले असून, त्यांना खरेदीच्या प्रत्येक रुपयाचा हिशेब आणि पारदर्शक व्यवहार अपेक्षित आहे. सध्या अनेक ठिकाणी सोन्याच्या किमतीवर तीन ते १५ टक्के किंवा त्याहून अधिक मेकिंग चार्जेस आकारले जातात. या पद्धतीचा गांभीर्याने पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. अग्रवाल म्हणाले, एखादा दागिना तयार करण्यासाठी कारागिराला दिले जाणारे मेहनताना आणि मजुरी ही त्याच्या कामाच्या स्वरूपावर, कौशल्यावर आणि वेळेवर अवलंबून असते. सोन्याचे दर दुप्पट झाले, तर त्याच डिझाइनचा दागिना तयार करण्यासाठी कारागिराची मेहनत, वेळ आणि कौशल्य दुप्पट होते का? निश्चितच नाही. त्याचप्रमाणे सोन्याचे दर कमी झाले तरी कारागिराची मेहनत कमी होत नाही.

स्माईल फाउंडेशन आणि बर्जर पेंट्सचा कौशल्य विकास उपक्रमाचा विस्तार

पुणे (दै. आरंभ पर्व)



घरगुती रंगकाम करणाऱ्या कामगारांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी स्माईल फाउंडेशन आणि बर्जर पेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'आयट्रेन ऑन व्हील्स' या कौशल्य विकास उपक्रमाचा पुणे आणि परिसरात विस्तार करण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे कामगारांना त्यांच्या परिसरातच मोफत तांत्रिक प्रशिक्षण दिले जात आहे. गेल्या चार वर्षांत देशभरातील ५.४८ लाख रंगकाम करणाऱ्या कामगारांना या उपक्रमाचा लाभ झाला आहे. देशातील २७ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधील ४१२ जिल्ह्यांत २७ फिरती प्रशिक्षण वाहने कार्यरत आहेत.

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे यांना 'कार्य महर्षी छंद सम्राट पुरस्कार' प्रदान

कलागुणांची कदर करून दिलीप डहाके यांनी श्रेष्ठत्व सिद्ध केले : डॉ. रवींद्र भोळे

पिंपरी-चिंचवड (दै. आरंभ पर्व)

समाजासाठी आपल्या आयुष्यातील अमूल्य वेळ समर्पित करून विविध क्षेत्रांत नवनिर्मितीचा ध्यास घेणाऱ्या ध्येयवेड्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करणे, हा अत्यंत प्रेरणादायी उपक्रम आहे. अशा पुरस्कारांमुळे समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळते आणि सुदृढ राष्ट्रनिर्मितीला बळ मिळते. छंद सम्राटांच्या कलागुणांची आणि कार्याची योग्य कदर करून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप गोविंदराव डहाके यांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे यांनी केले. पिंपरी-चिंचवड येथील सायन्स पार्कमध्ये छंद सम्राट सामाजिक संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय 'छंद सम्राट पुरस्कार सोहळ्या'चे आयोजन करण्यात आले होते. समाजासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सेवाव्रती कार्यकर्त्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी पद्मश्री गिरीश प्रभुणे हे होते. त्यांच्या हस्ते ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे यांना 'कार्य महर्षी छंद सम्राट पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. भोळे म्हणाले की, समाजासाठी त्याग करण्याची वृत्ती, इतरांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची संवेदनशीलता, योद्ध्याप्रमाणे ध्येयासाठी झटण्याची जिद्द आणि शास्त्राचा अभ्यास करण्याची वृत्ती ही श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वांची लक्षणे आहेत. अशा गुणांचा सन्मान करणारे आणि समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना प्रोत्साहन देणारे उपक्रम समाजाच्या जडणघडणीसाठी महत्त्वाचे आहेत.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी-चिंचवड महापालिकेचे विरोधी पक्षनेते तथा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, सायन्स पार्कचे संस्थापक अध्यक्ष प्रवीण तुपे, अखिल भारतीय साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवडचे अध्यक्ष राजन लाखे, प्रसिद्ध आर्मोनियमवादक राजीव परांजपे, सायन्स पार्कच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रद्धा खामप्रिया, उद्योजक तेजस शेठ शिंदे, अक्कलकोटचे उपनगराध्यक्ष राजू क्षीरसागर, अनिल बडगुजर, सूर्यकांत सोनार, ज्येष्ठ समाजसेवक संभाजी बारणे, राजेंद्र मगर, अमोल पाटील आणि चंद्रकांत पुराणिक आदी मान्यवर उपस्थित होते.


कार्यक्रमाचे आयोजन छंद सम्राट सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप गोविंदराव डहाके यांनी केले. संस्थेचे उपाध्यक्ष संतोष काळे, सचिव दीपक पाटील आणि कार्यवाहक प्रतीक अली वागकर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले. संग्राम पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी राज्यभरातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले छंद सम्राट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे



चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते अध्ययन केंद्रासह दोन नव्या विभागांचे उद्घाटन

पुणे(आरंभ पर्व) : डॉ. डी. वाय. पाटील समूहाच्या ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या (DPGU) स्कूल ऑफ लिबरल आर्ट्समध्ये अभिजात मराठी भाषा अध्ययन केंद्र तसेच मीडिया अँड कम्युनिकेशन आणितत्त्वज्ञान, राज्यशास्त्र , अर्थशास्त्र (PPE) या दोन नव्या विभागांचे उद्घाटन महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना भाषा, संस्कृती, माध्यमे आणि चिकित्सक विचार या क्षेत्रांमध्ये व्यापक शैक्षणिक संधी उपलब्ध होणार आहेत. यावेळी चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठाच्या परिसराला भेट देऊन नव्याने उभारण्यात आलेल्या सुविधा आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधांची पाहणी केली. मीडिया अँड कम्युनिकेशन विभागातील व्यावसायिक दर्जाचे कॅमेरे, ऑडिओ सिस्टीम आणि मॉनिटरिंग उपकरणांनी सुसज्ज स्टुडिओमध्ये विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणही त्यांनी पाहिले. विविध विभागांतील विद्यार्थ्यांनी आपले शैक्षणिक प्रकल्प सादर करत त्यांच्या अभ्यासक्रमातील प्रत्यक्ष अनुभवांची माहिती दिली. यावेळी मंत्र्यांनी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधत जिज्ञासा, आत्मविश्वास आणि उद्देशपूर्ण शिक्षणावर भर देण्याचे आवाहन केले. याप्रसंगी DPGU चे प्रो-चॅन्सलर डॉ. सोमनाथ पी. पाटील म्हणाले, "या नव्या उपक्रमांचे उद्घाटन केल्याबद्दल आम्ही चंद्रकांत (दादा) पाटील यांचे आभारी आहोत. भाषा आपली ओळख घडवते, संवाद आपल्याला अभिव्यक्तीची ताकद देतो, तर चिकित्सक विचार भविष्यातील दिशा दाखवतो. अभिजात मराठी भाषा अध्ययन केंद्र आणि नव्या विभागांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या मुळांशी जोडलेले राहतानाच जागतिक स्तरावरील संधींसाठी तयार व्हावे, हा आमचा उद्देश आहे. प्रश्न विचारण्याला प्रोत्साहन, विचारांचा सन्मान आणि जबाबदार नागरिक घडविणारे शिक्षण देण्यावर आमचा भर आहे."



'चित्रपताका-२०२६'च्या दुसऱ्या पर्वाचा दिमाखदार शुभारंभ!

पुणे(आरंभ पर्व) : सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने आयोजित 'चित्रपताका-२०२६' या महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाच्या दुसऱ्या पर्वाचा उद्घाटन सोहळा रविवारी, १५ नोव्हेंबरला दिमाखात संपन्न झाला. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. 'बंधू' या सिनेमाच्या प्रदर्शनाने रविवारपासून या चार दिवसीय महोत्सवाचा प्रारंभ झाला असून महोत्सवात ३३ सिनेमे आणि १५ हून अधिक संवादसत्रांची पर्वणी रसिकांना मिळणार आहे. प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी संकुलात १५ ते १८ नोव्हेंबर दरम्यान हा महोत्सव संपन्न होणार असून रविवारी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याला सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, प्रमुख पाहुण्या म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, महोत्सव संचालक पुरुषोत्तम बेर्डे, प्रभात चित्र मंडळाचे अध्यक्ष किरण शांताराम, उद्घाटकीय सिनेमा असलेल्या 'बंधू' चित्रपटातील कलाकार जितेंद्र जोशी, उपेंद्र लिमये यांच्यासह अलेक्झांडर माक्सुको (बेलारूस), फर्झाना अहमद चौधरी (बांगलादेश), पीअर स्टिवरलिंक (बेल्जिअम), कुईन जी (चीन), झिपोर झामा (दक्षिण आफ्रिका), दहलिया तबकोल (इजिप्त), वू थी टू (व्हिएतनाम), महम्मद कुर्निया वान (इंडोनेशिआ), मिस ऑड्रिना विलानोएवा बेसरल (मेक्सिको), मिस प्रियांका (श्रीलंका) आदी देशांचे दुतावास अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.



चित्रपटाला 'माध्यम' म्हणून समजून घेण्याची गरज!

पुणे(आरंभ पर्व) : पडद्यावर दिसणाऱ्या सिनेमामागे लेखनाची आणि प्रत्यक्ष निर्मितीची वर्षानुवर्षांची तपश्चर्या असते. वरवरच्या विचाराने सिनेमावर सहज टीका करणे सोपे असते, पण सिनेमा बनवणे म्हणजे एक डोंगर सर करून दुसरा डोंगर चढण्यासारखा कठीण संघर्ष असतो. त्यामुळे सिनेमावर भाष्य करताना त्या कलाकृतीमागील मेहनत ध्यानात घेणे आवश्यक आहे. तसेच सिनेमाचा 'माध्यम' म्हणून विचार करून त्याचा आस्वाद घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सिनेअभ्यासक मिलिंद दामले यांनी केले. 'चित्रपताका' महोत्सवात सोमवारी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने आयोजित 'चित्रपताका' हा महाराष्ट्र शासनाचा अधिकृत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचा मराठी चित्रपट महोत्सव रविवारपासून पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी संकुलात सुरू आहे. या चार दिवसीय महोत्सवात सोमवारी 'अथातो सिनेजिज्ञासा' ही एफटीआयआय, पुणे येथील सहप्राध्यापक व सिनेअभ्यासक मिलिंद दामले यांची कार्यशाळा संपन्न झाली.

'लकी ड्रॉ'मध्ये विजेत्यांना इलेक्ट्रीक कार, दुचाकी व आयफोन

बाणेरच्या दालनात विशेष कार्यक्रमाचे आयोजन; पहिल्याच 'लकी ड्रॉ'ला ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद

पुणे (दै. आरंभ पर्व)

मॉलमध्ये, पेट्रोल पंपावर किंवा एखाद्या दुकानात आपणही 'लकी ड्रॉ'चे कूपन भरतो आणि नंतर आपण ते विसरुनही जातो. पण काही दिवसांनी ध्यानीमनी नसताना कार किंवा दुचाकी जिंकल्याचा फोन आल्यावर होणारा आनंद स्वप्नवत असतो, तसेच दृश्य रविवारी एस. एस. नगरकर ज्वेलर्सच्या 'लकी ड्रॉ'मध्ये पाहायला मिळाले. आपल्याला कार, दुचाकी आणि आयफोन मिळाला, यावर काही क्षण त्यांचा विश्वासच बसेना; पण खात्री झाल्यावर आनंद गगनात मावेनासा झाला.

नगरकर ज्वेलर्सच्या तुळशीबाग, लक्ष्मी रोड, कोथरुड, ठाणे, बाणेर अशा पाचही दालनांमध्ये हा लकी ड्रॉ ठेवण्यात आला होता. २४ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत खरेदी करणाऱ्या आणि कूपन्स भरणाऱ्यांना यामध्ये सहभागी होता आले. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी बाणेरच्या दालनात अतिशय पारदर्शकपणे या लकी ड्रॉचा निकाल लावण्यात आला. यामध्ये ठाणे, कोथरुड आणि बाणेरच्या दालनांमध्ये खरेदी करुन कूपन भरलेल्या ग्राहकांनी बाजी मारली.



यामध्ये पहिले बक्षीस टाटा टिआगो इलेक्ट्रीक कार डॉ. अर्चना पवार (ठाणे दालन) यांना, दुसरे बक्षीस इलेक्ट्रीक अक्सेस दुचाकी डॉ. आसावरी कानडे (कोथरुड दालन) यांना, तर तिसरे बक्षीस आयफोन १७ सोनाली बागडे (बाणेर दालन) यांना मिळाले. ही बक्षिसे जाहीर झाल्यानंतर संबंधित विजेत्यांना दूरध्वनीद्वारे कळवण्यात आले. यावेळी नगरकर ज्वेलर्सचे संचालक वसंत नगरकर, स्वाती वल्लभ नगरकर, वासंती वसंत नगरकर, प्रसाद नगरकर, पुष्कर नगरकर, पूजा नगरकर कुलकर्णी, रोहन कुलकर्णी उपस्थित होते.



या 'लकी ड्रॉ'बाबत बोलताना पुष्कर नगरकर म्हणाले, 'लकी ड्रॉ'चे हे पहिलेच वर्ष होते; तरीही ग्राहकांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दसरा दिवाळीआधी सोन्याचा दर जास्त होता; पण सणासुदीला त्यात घट झाल्याने खरेदीचे प्रमाण वाढले. ग्राहकांनी सोने, सोन्याचे दागिने तसेच चांदीचीही खरेदी केली. सणवार, लग्नसराई या निमित्ताने या काळात खरेदीचे प्रमाण वाढलेले असल्याने आम्ही आता लकी ड्रॉ जाहीर केला. वाढते प्रदूषण, इंधनाची वाढती किंमत याचा विचार करुन बक्षीस म्हणून इलेक्ट्रीक गाडी देण्याचा विचार केला. याशिवायही दालनात ठराविक रकमेची खरेदी करणाऱ्यांसाठी 'स्पिन टू विन' अशी खास ऑफर देण्यात आली होती, ज्यामध्ये ग्राहकांनी घड्याळ, डीनर सेट, पाण्याची बाटली यांसारखी विविध बक्षिसे जिंकली.

प्रसाद नगरकर म्हणाले, बाणेरचे शोरुम दोन महिन्यांपूर्वीच सुरु करण्यात आले. मात्र येथील ग्राहकांनी अनपेक्षित प्रतिसाद देत नगरकर ज्वेलर्सवर भरभरुन प्रेम केले आहे. राजवाडा कलेक्शन ही या दालनाची खासियत आहे. यामध्ये ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार दागिने डिझाईन करुन मिळणार आहेत. राजवाडा या विशेष संकल्पनेअंतर्गत एलिट क्लासचे दागिने घडवण्यात येतात, यात एक डिझाईन एकदाच घडवले जाते आणि ते एक्स्लुझिव्ह असते. हे राजवाडा दालन केवळ खरेदीसाठीच नाही तर पाहण्यासाठीही अतिशय आकर्षक अशी रचना असलेले आहे. येत्या काळात आपल्या विविध जिल्ह्यांमध्ये आणखी विस्तार करण्याचा विचार आहे.

विठ्ठलाची साथ आणि मुलं घेत असलेले कष्ट यामुळेच व्यवसाय चांगल्या रितीने वाढत असल्याची भावना स्वाती व वासंती नगरकर यांनी यावेळी व्यक्त केल्या. सर्व दालनांतील व्यवस्थापक यावेळी आवर्जून उपस्थित होते. लीना गोखले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

रोमानोव्हने फिस्टी ग्वावा चिली लाँच करत केला पोर्टफोलिओचा विस्तार

पुणे (दै. आरंभ पर्व)

रोमानोव्ह व्होडका या इनब्रू बेव्हरेजेसच्या भारतातील सर्वाधिक पसंती मिळवणाऱ्या व्होडका ब्रँडने महाराष्ट्रात फिस्टी ग्वावा चिली फ्लेव्हर्ड व्होडका लाँच करून आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण फ्लेव्हर आणला आहे. पेरूच्या गोडव्याची सांगड मिरचीच्या ठसक्याशी घालणारा हा नवीन व्हेरियंट स्वादांचा अनोखा मेळ साधतो, ज्यामुळे रोमानोव्हच्या विस्तारत चाललेल्या फ्लेव्हर्ड व्होडका पोर्टफोलिओमध्ये वेगळा पर्याय जोडला गेला आहे. हे लाँच बाजारपेठेत ताज्या आणि समकालीन उत्पादनांची भर घालून आजच्या ग्राहकांसाठी स्वादाचा अनुभव नव्याने परिभाषित करण्याबाबत रोमानोव्हची कटिबद्धता अधिक दृढ करते. आकर्षक गुलाबी रंगछटा आणि आधुनिक पॅकेजिंगसह फिस्टी ग्वावा चिली ब्रँडच्या फ्लेव्हर्ड व्होडका पोर्टफोलिओला वैशिष्ट्यपूर्ण दृश्य ओळख प्रदान करतो. आपल्या 'रेडी व्हेन यू आर' तत्त्वज्ञानाशी बांधील राहत रोमानोव्ह सहजपणे आनंद घेता येईल अशा व्होडका अनुभवाला प्रोत्साहन देते, जो विविध प्रसंगांमध्ये आणि ग्राहकांच्या पसंतीशी सहज जुळवून घेतो. त्याची वैविध्यता आणि सहज मिसळण्याची क्षमता ग्राहकांसाठी सुलभ पर्याय ठरते, मग ती दैनंदिन मिक्सर्ससोबत सहज मिसळायची असो किंवा विविध कॉकटेल्ससाठी बेस म्हणून वापरायची असो.



भांडी व दिवाळी भेट देऊन जपली सामाजिक बांधिलकी

आशीर्वाद वृद्धाश्रमाला लायन्स क्लब इको फ्रेंड्सचा मदतीचा हात

- चार वर्षांपासून वृद्धाश्रमासाठी विविध सुविधा
- पायाभूत विकासासाठी भारत कुलकर्णी व गौरी कुलकर्णी यांच्याकडून २१ हजारांची देणगी

नांदेड फाटा (दै. आरंभ पर्व)

वृद्धापकाळात आधाराची गरज असलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी लायन्स क्लब पुणे इको फ्रेंड्सच्या वतीने गेल्या चार वर्षांपासून आशीर्वाद वृद्धाश्रमासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. यंदा दिवाळीनिमित्त वृद्धाश्रमाला नवीन भांड्यांचा संच आणि सणाची भेट देऊन ज्येष्ठ नागरिकांसोबत आनंद साजरा करण्यात आला.



श्री स्वामी कृपा आशीर्वाद वृद्ध निवास येथे झालेल्या या उपक्रमावेळी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांची भेट घेतली. वृद्धाश्रमाच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन नवीन भांडी भेट देण्यात आली. लायन्स क्लब पुणे इको फ्रेंड्सचा हा प्रकल्प २०२२ पासून सुरू आहे. गेल्या चार वर्षांत वृद्धाश्रमाच्या छताचे नूतनीकरण, पाणी शुद्धीकरण यंत्रणा, वॉकर, भांडी तसेच नियमित किराणा साहित्य पुरविण्यासाठी क्लबने मदत केली आहे. केवळ वस्तूंची मदत न करता वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत वेळ घालवणे, हाही या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. आगामी तीन वर्षेही हे काम सुरू ठेवण्याचा क्लबचा मानस आहे. वृद्धाश्रमाचे व्यवस्थापन विकास डेढगे आणि त्यांचे कुटुंबीय करीत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत उद्योजक भारत कुलकर्णी आणि गौरी कुलकर्णी यांनी वृद्धाश्रमातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी २१ हजार रुपयांची देणगी दिली. या वेळी क्लबचे माजी अध्यक्ष अरुण कुलकर्णी, अध्यक्ष अनिल मंद्रूपकर, रमेश पसरिजा, राणी पसरिजा, सुनीता मंद्रूपकर, भारत कुलकर्णी आणि गौरी कुलकर्णी उपस्थित होते. या उपक्रमासाठी मनोज रूट, उमेश मोरे, मुकुंद विनायक शितोळे, दीपक राऊत आणि प्राची धोंगडे यांनी सहकार्य केले. वृद्धाश्रमाला सातत्याने मदत करणारे माजी अध्यक्ष अनिल मंद्रूपकर यांच्यासह क्लबच्या सर्व सदस्यांचे विकास देडगे यांनी आभार मानले.

दिव्यांग मुलांच्या कष्टातून उजळली गरजवंतांची दिवाळी!

जुन्नर -मारुती मिंडे (दै. आरंभ पर्व)

दिवाळी म्हणजे केवळ आपल्या घरात दिवे लावून आनंद साजरा करण्याचा सण नव्हे, तर दुसऱ्यांच्या आयुष्यात आनंदाचा आणि आशेचा प्रकाश निर्माण करण्याचा सण आहे. याच विचाराला कृतीची जोड देत दिव्यांग कला विकास केंद्र संचलित नंदनवन परिवारातील बौद्धिक दिव्यांग मुलांनी यंदाची दिवाळी अनोख्या सामाजिक उपक्रमातून साजरी केली. या मुलांनी स्वतःच्या हातांनी पणत्या रंगवून आकर्षक स्वरूप दिले. या पणत्यांची विक्री करून त्यांनी स्वतःच्या कष्टातून स्वकमाई केली. विशेष म्हणजे, या कमाईचा उपयोग स्वतःच्या आनंदासाठी न करता समाजातील गरजू घटकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी केला. आपल्या मेहनतीतून मिळालेल्या पैशांतून जुन्नर तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक, गरजू महिला तसेच आपल्यासारख्याच दिव्यांग बांधवांना दिवाळीचा फराळ, नवीन कपडे आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून या मुलांनी दातृत्व, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीचा अनोखा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. समाजात अनेकदा दिव्यांग मुलांकडे मदतीची गरज असणारी मुले म्हणून पाहिले जाते. मात्र, याच मुलांनी आपल्या कष्टातून दुसऱ्यांना मदतीचा हात देत दिव्यांगत्व हे दातृत्वाच्या आड येत नसल्याचे सिद्ध केले. योग्य संधी, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन मिळाल्यास दिव्यांग मुलेही स्वावलंबी बनून समाजाला मोठे योगदान देऊ शकतात, हा संदेश या उपक्रमातून मिळाला. या उपक्रमाबाबत संस्थेचे संस्थापक सदस्य विकास बाजीराव घोगरे यांनी सांगितले की, मुलांच्या कष्टाचे चीज झाले असून त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहून मन भरून आले. मुलांनी स्वतःच्या मेहनतीतून दुसऱ्यांची दिवाळी गोड केली, हीच आमच्यासाठी खरी दिवाळी आहे. दिवे तर अनेकांनी लावले असतील; मात्र नंदनवन परिवारातील मुलांनी स्वतःच्या कष्टाच्या प्रकाशाने इतरांचे जीवन उजळवले आहे.



या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व मुलांचे तसेच सहकार्य करणारे दाते, हितचिंतक आणि शुभचिंतक यांचे संस्थेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. 'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे; देता देता एक दिवस देणाऱ्याचे हातही घ्यावे' या उक्तीचा खरा अर्थ नंदनवन परिवारातील मुलांनी आपल्या कृतीतून दाखवून दिला आहे. दिव्यांग मुलांच्या या दातृत्वाने जुन्नर तालुक्यात माणुसकीचा दीप उजळला आहे.



सिद्धार्थ भोकरे यांनी घेतली सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकाऱ्यांची भेट

सिंधुदुर्ग(दै. आरंभ पर्व)

मा. सिद्धार्थजी भोकरे यांनी सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी श्रीमती तृप्ती धोडमिसे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत सणाच्या आनंदात सहभागी झाले. या सदिच्छा भेटीदरम्यान त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधला. दीपावलीच्या निमित्ताने झालेल्या या भेटीमुळे सद्भावना आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती तृप्ती धोडमिसे यांनीही शुभेच्छांचा स्वीकार केला.

केईएम रुग्णालयात 'मधुसंवाद' दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन

पुणे (दै. आरंभ पर्व)

जागतिक मधुमेह दिनानिमित्त केईएम रुग्णालयाच्या डायबेटिस युनिट तर्फे बालमधुमेही मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, विविध सांस्कृतिक आणि गुणदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी टाइप १ मधुमेह असलेल्या मुलांसाठीच्या 'मधुसंवाद' या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.याप्रसंगी केईएम हॉस्पिटल पुणेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीन वाडिया, जगप्रसिध्द संशोधक व केईएम हॉस्पिटल पुणे येथील डायबेटिस युनिटचे प्रमुख डॉ.चित्तरंजन याज्ञिक,डायबेटॉलॉजी आणि स्लिप मेडिसिन विभागाच्या प्रमुख डॉ. स्मिता धाडगे, बालरोगतज्ञ व पेडीयाट्रिक डायबेटीस विभागाच्या प्रमुख डॉ. कल्पना जोग आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात बालमधुमेही मुलांनी चित्रकला स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कल्पकतेचा आणि कलागुणांचा आविष्कार सादर केला. त्यानंतर 'मधुसंवाद' विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. बालमधुमेही मुले, त्यांचे पालक आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले. मधुमेहाचे व्यवस्थापन ही केवळ वैद्यकीय उपचारांची बाब नसून मुलांच्या भावनिक, सामाजिक आणि व्यक्तिमत्त्व विकासालाही तितकेच महत्त्व आहे, हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. केईएम हॉस्पिटल पुणेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीन वाडिया म्हणाल्या की, टाईप १ मधुमेहींच्या आयुष्यातील प्रवासामध्ये आई-वडिलांची भूमिका तितकीच महत्वाची असते रुग्णालय व येथील डॉक्टरांवर ठेवलेला विश्वास यासाठी सर्व पालकांचे त्यांनी आभार मानले डॉ.चित्तरंजन याज्ञिक म्हणाले की, पुण्यातील या प्रख्यात मधुमेह विभागाची स्थापना याच सभागृहात एका लहान रोपासारखी झाली होती, विशेष म्हणजे यासाठी बानू कोयाजींचे वरदान लाभले होते. त्या काळी भारतीय लोकांमध्ये मधुमेहाचे प्रमाण नगण्य असल्याचा सर्वसाधारण समज होता, परंतु मी विद्यार्थी असल्यापासूनच समाजात आणि विशेषतः तरुण पिढीत मधुमेह मोठ्या प्रमाणावर असल्याचे सातत्याने दिसत होते. हाच महत्त्वाचा अभ्यास करण्यासाठी मिळालेल्या त्या पहिल्या ग्रांटचे उद्घाटन याच ठिकाणी पार पडले होते. १९८७ मध्ये 'भारतीय लोकांमध्ये डायबिटीसचा अभ्यास' करण्यासाठी पहिली संशोधन ग्रांट इंग्लंडमधून या संस्थेला मिळाली होती. आज हा विभाग ४०व्या वर्षात पदार्पण करत आहे.



मधुमेहाचे व्यवस्थापन केवळ उपचारांपुरते मर्यादित नसून, ते डॉक्टर आणि संपूर्ण कर्मचारी वर्गाच्या रुग्णांप्रती असलेल्या संवेदनशीलतेवर अवलंबून असते, याच तत्त्वावर केईएम हॉस्पिटल मधील हा विभाग वाटचाल करत असून या क्षेत्रात आपले अग्रेसर स्थान टिकवून आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
दैनिक आरंभपर्वमध्ये
बातमीदार होण्याची संधी!
पुणे शहरासह संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रतिनिधींची नियुक्ती करणे आहे.
अल्पावधीतच पुणे शहरासह जिल्ह्यात नावारूपास आलेल्या दैनिक आरंभपर्व या वृत्तपत्रासाठी पुणे शहर, उपनगरे तसेच जिल्ह्यातील विविध तालुके व ग्रामीण भागांमध्ये बातमीदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे.
पत्रकारितेची आवड असणाऱ्या,
सामाजिक प्रश्नांची जाण असणाऱ्या
आणि आपल्या परिसरातील जनतेचे
प्रश्न निर्भीडपणे मांडण्याची इच्छा असणाऱ्या
उत्साही व्यक्तींना संधी...
दैनिक आरंभपर्व PRESS
नियुक्ती करावयाची ठिकाणे
पुणे शहर व उपनगरे :
कात्रज, वारजे माळवाडी, कर्वेनगर, बाणेर, औंध, कोथरूड, हडपसर, मांजरी, आव्हाळवाडी, मुंढवा, कोरेगाव पार्क, गुजरवाडी, संगमवाडी, येरवडा, वडगाव शेरी, खराडी, वडकी, फुरसुंगी, थेऊर, लोहगाव, विश्रांतवाडी, दिघी आदी परिसर.
जुन्नर तालुका – नारायणगाव, आळेफाटा, बेल्हे, माळशेज, नाणेघाट, शिरोली.
आंबेगाव तालुका – भीमाशंकर, तळघर.
खेड तालुका – खेड, चाकण, बहुळ, वाडा, श्री क्षेत्र आळंदी, सोलू, मरकळ.
शिरूर तालुका – शिरूर, शिक्रापूर, रांजणगाव गणपती, कारेगाव, न्हावरा, तळेगाव ढमढेरे, केंदूर, पाबळ.
हवेली तालुका
उरुळी कांचन, न्हावी सांडस, पेरणे, पिंपरी सांडस.
दौंड तालुका
दौंड शहर, हिंगणगाव, यवत, राहू, पारगाव-शालू-मालू, केडगाव स्टेशन, वरवंड, खुटबाव, गिरीम, कुरकुंभ.
बारामती तालुका
नीरा, सुपा, सोमेश्वरनगर, वालचंदनगर, उंडवडी.
इंदापूर तालुका
वडापुरी, बावडा, सराटी, अंथुर्णे, निमगाव केतकी, भिगवण.
मावळ तालुका
वडगाव मावळ, मळवली, कामशेत, लोणावळा.
मुळशी तालुका
मुळशी शहर, पिरंगुट, पौड रोड, खारावडे म्हसोबा.
इच्छुकांनी संपर्क साधावा
श्री. लक्ष्मण साबळे ८६०५२८४२७२
श्री. सोमनाथ साळुंके ८४४६७९९३८३
श्री. प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२

दै. आरंभ पर्वला जाहिरात देऊन तर पहा..!

आपल्या व्यवसायाची भरारी, आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा **दैनिक आरंभ पर्व.**

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरणीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



आपल्या यशाची सुरुवात योग्य प्रसिद्धीपासून...!

आजच जाहिरात द्या आणि आपल्या व्यवसायाला द्या नवी ओळख..!

दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात, उद्याची यशोगाथा..!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार NEWS CHANNEL



दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!

आपणही बना आमच्या टीमचा भाग !



महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

आम्हाला हवे आहेत :

पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक.
पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.

कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.

आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.

कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

आमच्याशी जोडल्याने मिळेल :

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- निःपक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! **समाजाचा आवाज बना!**

आपली ओळख करा...
आपला आवाज बुलंद करा!

संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!